# ६२ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा

## चंद्रपूर केंद्रातून 'जेंडर ॲन आयडेंटीटी' प्रथम

---

**मुंबई, दि. ११ डिसेंबर** : ६२ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत चंद्रपूर केंद्रातून **नवोदिता, चंद्रपूर** या संस्थेच्या **जेंडर ॲन आयडेंटीटी** या नाटकाला प्रथम पारितोषिक तसेच **सर्वोदय शिक्षण मंडळ, चंद्रपूर** या संस्थेच्या **द फियर फॅक्टर** या नाटकास द्वितीय पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक श्री. बिभीषण चवरे यांनी आज एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे केली आहे. या दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे **चंद्रपूर** केंद्रावरील अन्य निकाल पुढीलप्रमाणे-

**युवा शहीद बहुउद्देशीय संस्था, चंद्रपूर** या संस्थेच्या **अशी पाखरे येती** या नाटकासाठी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. **दिग्दर्शन**: प्रथम पारितोषिक प्रशांत कक्कड (नाटक-जेंडर ॲन आयडेंटीटी), द्वितीय पारितोषिक डॉ. प्रमोद काटकर (नाटक- द फिअर फॅक्टर), **प्रकाश योजना** प्रथम पारितोषिक मिथुन मित्र (नाटक-जेंडर ॲन आयडेंटीटी), द्वितीय पारितोषिक-ऋषभ धापोडकर (नाटक-द फिअर फॅक्टर), **नेपथ्य** : प्रथम पारितोषिक तन्वी इंगळे (नाटक-द फिअर फॅक्टर), द्वितीय पारितोषिक सुशांत भांडारकर (नाटक-जेंडर ॲन आयडेंटीटी), **रंगभूषा** : प्रथम पारितोषिक शुभदा कक्कड (नाटक- जेंडर ॲन आयडेंटीटी), द्वितीय पारितोषिक मुक्तरंग सोनटक्के (नाटक- रुपायन) **उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक** प्रशांत मडपूवार (नाटक-जेंडर ॲन आयडेंटीटी) व कल्याणी भट्टी (नाटक-जेंडर ॲन आयडेंटीटी), **अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे** अपूर्वा खनगन (नाटक-अजूनही चांदरात आहे), विशाखा देशपांडे (नाटक-अशी पाखरे येती), नूतन धवने (नाटक-लाडू), सुमेधा श्रीरामे (नाटक-द फिअर फॅक्टर), तुषार सहारे (नाटक-अशी पाखरे येती), मकरंद परदेशी (नाटक-द फिअर फॅक्टर), शंकर लोडे (नाटक-अंधाधुंद), डॉ. प्रजेश घडसे (नाटक-काळ्या दगडावरची रेघ)

दि. २० नोव्हेंबर, २०२३ ते ०७ डिसेंबर, २०२३ या कालावधीत प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह, चंद्रपूर येथे अतिशय जल्लोषात झालेल्या या स्पर्धेत एकूण १८ नाट्य प्रयोग सादर करण्यात आले. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून श्री. संजय दखणे, श्री. सुहास जोशी आणि श्रीमती प्रतिभा पाटील यांनी काम पाहिले.

सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव श्री. विकास खारगे यांनी विजेत्यांचे अभिनंदन केलेले आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी प्रथम व द्वितीय आलेल्या नाटकाच्या संघाचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले असून भविष्यातही या संघांनी व कलाकारांनी सर्वोत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

⊗⊗⊗